आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता

२ जून २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- या निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत राखण्यात यश मिळण्याचा बहुसंख्य मतदानोत्तर कल चाचण्यांचा निष्कर्ष

- सिक्कीम विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी सिक्किम क्रांतिकारी मोर्चाला प्रचंड बहुमत तर अरुणाचल प्रदेशात भाजपाला निर्णायक बहुमत

- मे २०२४ मधे वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख ७३ हजार कोटी रुपये

**आणि**

- टिट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, अमेरिकेची विजयी सलामी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ मतदारसंघामध्ये मतदान झालं. बिहारमध्ये ५१ पूर्णांक ९२ शतांश टक्के, हिमाचल प्रदेशमध्ये ७० पूर्णांक पाच शतांश, झारखंडमध्ये ७० पूर्णांक ६६ शतांश, पंजाबमध्ये ६१ पूर्णांक ३२शतांश, उत्तर प्रदेशात ५५ पूर्णांक ५९शतांश, पश्चिम बंगालमध्ये ७३ पूर्णांक ७९शतांश, ओडिशात ७० पूर्णांक ६८शतांश, तर चंडीगडमध्ये ६७ पूर्णांक ९० शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. हा टप्पा संपल्यामुळे १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या जगातल्या सर्वांत मोठ्या मतदान प्रक्रियेची सांगता झाली आहे. या सातही टप्प्यांमध्ये मतदान

शांततेत आणि सुरळीतपणे पार पडल्याचं निवडणूक आयोगानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रीया काल संपल्यानंतर विविध वृत्तसंस्था आणि अन्य संस्थांनी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल चाचणीचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी, लोकसभा निवडणुकीत सत्ता टिकवून ठेवणार असल्याचं, बहुतांश अंदाजांमध्ये दिसून येत आहे. २७२ जागांचा बहुमताचा टप्पा सहजी ओलांडत राष्ट्रीय लोकशाही आघाडी ५४३ सदस्यांच्या लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत मिळवू शकेल असा अंदाज अनेक संस्थांनी वर्तवला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील NDA सरकार ३५० हून अधिक जागा जिंकून पुन्हा सत्तेत येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या इंडि आघाडीला १२५ ते १५० जागा मिळतील. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील NDA आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडि आघाडी यांच्यात थेट लढत झाली आहे. त्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाल्यास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करता येईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक खाजगी वृत्तवाहिन्यांनी वर्तवलेले निकालांचे अंदाज काँग्रेसने नाकारले असून हे अंदाज बोगस असल्याचं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. इंडिया आघाडीच्या नेत्यांचं मनोबल खच्ची करण्यासाठी भाजपने हे अंदाज प्रसारित केले आहेत, परंतु त्यांचा हेतू सफल होणार

नाही असं त्यांनी म्हटलं आहे. सर्व राज्यांमधल्या काँग्रेस नेत्यांनी पाठवलेल्या विश्लेषणानुसार इंडी आघाडीला कमीत कमी २९५ जागा मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, यांनी आज पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक घेतली. दूरस्थ पद्धतीने झालेल्या या बैठकीत पक्षाचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल, ज्येष्ठ नेते राहुल गांधी, तसंच निवडणूक लढवणारे सर्व उमेदवार आणि प्रदेश काँग्रेस समित्यांचे अध्यक्ष सहभागी झाले होते.

**<><><><><>**

सिक्किम विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी सिक्किम क्रांतीकारी मोर्चाला पूर्ण बहुमत मिळालं आहे. सिक्किमधल्या ३२ पैकी ३१ जागांवर सिक्किम क्रांतीकारी मोर्चाने विजय मिळवला आहे. तर सिक्किम डेमोक्रॅटिक फ्रंटच्या वाट्याला एक जागा आली आहे.

अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. ६० जागांपैकी ३७ जागांवर भाजपाने विजय मिळवला आहे. तर आठ जागांचे निकाल येणं बाकी असून या जागांवरही भाजपा आघाडीवर आहे. तर नॅशलन पीपल्स पार्टी सहा जागांवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराचं एकूण संकलन यावर्षीच्या मे महिन्यात १ लाख ७३ हजार कोटी रुपये झाल्याचं अर्थ मंत्रालयाने सांगितलं आहे. या संकलनात दहा टक्के वार्षिक वाढ झाली आहे. यापैकी केंद्रीय वस्तू आणि सेवा कर संकलन ३२

हजार कोटी रुपये, राज्य वस्तू आणि सेवा कर संकलन ४० हजार कोटी, आणि एकत्रित संकलन ८७ हजार ७८१ कोटींहून अधिक आहे. तर उपकर संकलन १२ हजार कोटींहून अधिक आहे. दरम्यान, आर्थिक वर्ष २०२४-२५ वर्षातलं एकूण जीएसटी संकलन ३ लाख ८३ हजार कोटी रुपये असल्याचं अर्थ मंत्रालयाची आकडेवारी सांगते आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तेलंगण राज्याच्या स्थापनादिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. तेलंगणने देशाच्या विकासात दिलेल्या योगदानाबद्दल देशवासियांना अभिमान वाटतो असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या पोस्ट मधे म्हटलं आहे. तेलंगणच्या विकासासाठी आपण वचनबद्ध असल्याचंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

तेलंगण राज्याच्या स्थापनादिनानिमित्त आज मुख्यमंत्री रेवन्त रेड्डी यांच्या हस्ते सिकंदराबाद इथल्या परेड मैदानावर ध्वजारोहण करण्यात आलं. याप्रसंगी तेलंगणाच्या राज्यगीताचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि इतर मान्यवर उपस्थित होते. त्याआधी तेलंगण राज्याच्या स्थापनेसाठी हौतात्म्य पत्करलेल्या नागरिकांना मुख्यमंत्र्यांनी श्रद्धांजली वाहिली. काँग्रेस सरकारनं राज्याच्या नागरिकांना दिलेली सर्व आश्वासनं नक्की पूर्ण केली जातील असं काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आपल्या विशेष संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने चार दिवसांच्या कारवाईची मोहीम राबवली. यात ९ पूर्णांक ७९ किलो

सोनं आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. त्यांची किंमत ८८ लाख रुपये इतकी आहे. २७ ते ३० मे दरम्यान केलेल्या वीस कारवायांमध्ये चार जणांना अटक केल्याची माहिती सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, आज सहयजमान अमेरिकेनं विजयी सलामी दिली. अमेरिकेत दलास इथं अमेरिका आणि कॅनडा यांच्यात झालेला, स्पर्धेचा सलामीचा सामना अमेरिकेनं ७ गडी राखून जिंकला. या सामन्यात अमेरिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर कॅनडानं नवनीत धालीवाल आणि निकोलस कर्टन यांच्या अर्धशतकी खेळींच्या जोरावर निर्धारीत २० षटकांत ५ बाद १९४ धावा केल्या. विजयासाठीचं १९५ धावांचं आव्हान अमेरिकेनं १७ षटकं आणि ४ चेंडूतच, केवळ ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. अमेरिकेच्या अँड्रिस यानं ६५ तर एरॉन जोन्स यानं नाबाद ९४ धावा केल्या.

स्पर्धेचा दुसरा सामना आज गयाना इथं यजमान वेस्ट इंडिज आणि पापुआ न्यू गिनी यांच्यात होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

स्पर्धेतला भारताचा सलामीचा सामना ५ जुनला आयर्लंडसोबत होणार आहे.

<><><><><>

उष्णतेच्या लाटेमुळे झालेल्या मृत्यूंबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अनेक ठिकाणी प्रशासनानं योग्य पाऊलं उचलून उष्णतेचा लाटेचा सामना कराव्या लागणाऱ्यांना मदत केल्याचं आणि इतरही नागरिक मदतीसाठी पुढं आल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. कामगार, शेतकरी,

सरकारी कामांमध्ये व्यग्र कर्मचारी, तसंच इतर नागरिकांना उष्णतेपासून वाचण्यासाठी योग्य निवारा मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे. तापमानविषयक समस्यांबाबतच्या कारणांचं निराकरण करणं आणि आवश्यक काळजी घेण्याबाबत जनजागृती निर्माण करण्याची गरज असल्याचंही मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

ईशान्य भारत आणि दक्षिण भारताच्या किनारपट्टीलगतच्या भागात पुढल्या तीन चार दिवसांत मुसळधार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तसंच अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल आणि सिक्किमच्या काही भागात पुढच्या चार दिवसांत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
२ जून २०२४ - रविवार